## -: प्रेसनोट दिनांक- २३/१२/२०२४ :-

**आरोपी लोकसेवक दुष्यंत विश्वास कोळी, नगर भुमापन अधिकारी, इचलकरंजी, सध्या रा. फॉर्च्युन प्लाझा मागे, प्लॅट नं.२०७, फॉर्च्युन अव्हेन्यु, सांगली रोड, इचलकरंजी, ता.हातकणंगले,जि.कोल्हापूर मुळ रा. शिरोळ वाडी रोड प्रभात हॉस्पीटल, जयसिंगपूर, ता. शिरोळ, जि.कोल्हापूर यांनी लाच मागणी केलेबाबत.....**

---

यातील तकारदार यांचे व सहहिस्सेदार यांचे मालकीचे मौजे शहापूर ता.हातकणंगले जि.कोल्हापूर येथे गट नं.४५४, सि.स.नं.१९०२१ मध्ये प्लॉट नं.२७,२८,२९,३० असे प्लॉट असून त्यापैकी प्लॉट नं.२७,३० व प्लॉट नं. २८,२९ असे प्लॉट सामीलीकरण होण्याकरीता तकारदार यांनी नगर भुमापन अधिकारी कार्यालय, इचलकरंजी यांचे कार्यालयाकडे दि.२२/०७/२०२४ रोजी अर्ज केले होते. सदरचे अर्ज नगर भुमापन कार्यालयातील एका कर्मचारी यांचेकडे असल्याने तकारदार यांनी त्यांचेकडे चौकशी केली, त्यावेळी सदर कर्मचारी यांने तकारदार यांचे दोन्ही अर्ज व प्रकरणे ही जिल्हा अधीक्षक भुमि अभिलेख कोल्हापूर यांचे कार्यालयाकडे पाठवून त्याची प्रत तकारदार यांना दिली होती. त्यानंतर दि.१०/०९/२०२४ रोजी सदर कर्मचारी याने तकारदार यांना जिल्हा अधीक्षक भुमि अभिलेख कोल्हापूर यांचे कार्यालयालयातील तुमचे अर्ज ज्या टेबलला आहेत त्या टेबल चा चार्जही माझेकड आहे. मी तेथुन तुमच्या अर्जावर मंजूरी घेवून आणू शकतो, त्याकरीता ३०,०००/- रू. द्यावे लागतील असे म्हणून त्यांचे वरिष्ठांचे करीता लाचेची मागणी केली. त्यानंतर तकारदार यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर येथे तकार दिलेली होती.

तकारदार यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे दिलेल्या तकार अर्जाप्रमाणे पडताळणी केली असता पडताळणी मध्ये नगर भुमापन कार्यालयातील तकारदार यांचे काम पाहणारे कर्मचारी याने तकारदार यांना त्यांचे वरिष्ठ नगर भुमापन अधिकारी कोळी यांना भेटण्यास सांगितले. त्याप्रमाणे तकारदार हे दुष्यंत कोळी यांना भेटले असता नगर भुमापन अधिकारी कोळी यांनी तकारदार यांचे प्लॉटचे सामीलीकरणाचे काम जिल्हा अधीक्षक भुमी अभिलेख कोल्हापूर यांचे कार्यालयातून करून घेण्याकरीता म्हणून त्यांचे वरिष्ठांकरीता तकारदार यांचेकडे पंच्याहत्तर हजार रूपये लाचेची मागणी केलेचे निष्पन्न झाले.

सदरबाबत तकारदार यांनी आरोपी लोकसेवक दुष्यंत विश्वास कोळी, नगर भुमापन अधिकारी, इचलकरंजी वर्ग-२ रा.इचलकरंजी यांनी तकारदार यांचेकडे ७५,०००/- रूपये लाचेची मागणी मागणी केली आहे म्हणुन दिले फिर्यादीवरून त्याचेविरूध्द शिवाजीनगर पोलीस ठाणे, इचलकरंजी, जि.कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करणेची प्रकिया सुरू आहे.

सदरची कारवाई श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे. श्री. विजय चौधरी, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार वैष्णवी सुरेश पाटील, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि.कोल्हापूर, पोलीस निरीक्षक बापू सांळूके, सहा.पोलीस उपनिरीक्षक प्रकाश भंडारे, पो.हे. कॉ.संदिप काशिद, पो.ना.सचिन पाटील, पो.ना.सुधिर पाटील, म.पो.कॉ.पुनम पाटील चा.पो.कॉ.प्रशांत दावणे अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तकारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.

१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१
२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :-
०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.
३) वैष्णवी पाटील, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९७६४१४०७७७.
४) कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.
५) हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४
६) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.